## Newspaper : Vruttamanas

## Date : 21.07.2020

# पोदार महाविद्यालयाचा गुणवत्तेचा षट्कार



**मुंबई :** सांस्कृतिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करून मुंबई विद्यापीठाचा युवा महोत्सव जिंकणाऱ्या, माटुंगा येथील शि.प्र. मंडळाच्या रा. आ. पोदार महाविद्यालयाने यावर्षीच्या बारावीच्या परीक्षेत सलग सहाव्यांदा आपले अव्वल स्थान टिकवून ठेवले आहे. पोदार महाविद्यालयाची विद्यार्थिनी ईशा दामले हिने ९८.७६ टक्के गुण मिळवत एचएससी. परीक्षेत अव्वल स्थान मिळवले आहे. ईशा दामले ही राष्ट्रीय पातळीवरील जलतरणपटू आहे व शैक्षणिक क्षेत्रासोबतच नृत्य क्षेत्रातदेखील प्रवीण आहे. पोदार महाविद्यालयाचा २०१९–२० या शैक्षणिक वर्षाचा निकाल ९९.१८ टक्के इतका लागला व परीक्षेस बसलेल्या ८५६ विद्यार्थ्यांपैकी २१६ विद्यार्थी ९० टक्के व त्यापेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेत, तर त्यातील ९६ विद्यार्थी ९२ टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवून उत्तीर्ण झालेत. पोदार महाविद्यालय शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा व सामजिक कार्य यासाठी प्रसिद्ध आहे व या वर्षीच्या विद्यार्थ्यांनी पोदार महाविद्यालयाचा वारसा पुढे नेला आहे. विद्यार्थ्यांना योग्य ते मार्गदर्शन करणाऱ्या मुख्याध्यापिका डॉ. शोबना वासुदेवन, कनिष्ठ महाविद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना या यशाचे श्रेय जाते.


पश्चिम रेल्वे

ईएमयू कोचेसच्या यांत्रिकीकृत साफसफाईसाठी टर्नकी कंत्राट.

ई-निविदा सूचना क्र.: डीआरएम/आरएस/२०२०-२१/२ दिनांक: २०/०७/२०२०.